पुढारी

# जाहीर उद्घोषणा

## टॅग ऑफशोअर लि. (परिसमापनांतर्गत)च्या संपत्तीच्या इलेक्ट्रॉनिक लिलाव विक्री प्रक्रियेत सहभागाकरिता स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे आमंत्रण

टॅग ऑफशोअर लिमिटेड (टॅग) ही सध्या राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांचा आदेश दि २६.०९.२०१९ अंतर्गत इन्सॉल्व्हन्सी अँन्ड बँकरप्टसी कोड, २०१६ (आयबीसी) च्या तरतुदींअंतर्गत परिसमापन प्रक्रियेतून जात आहे व श्री. सुदीप भट्टाचार्य यांची तिचे परिसमापक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
टॅगच्या व्यक्तिगत वेसल्सच्या संपत्तीच्या आयबीसीनुसार तसेच ईओआय प्रक्रिया दस्तावेजांमध्ये विहित अटी व शर्तीच्या आधारावर ''जशी आहे जेथे आहे तत्वावर'', ''जशी आहे जी आहे तत्वावर'', ''जी काही आहे तेथे आहे तत्वावर'' खरेदीसाठी इलेक्ट्रॉनिक लिलाव विक्री प्रक्रियेत (ई-लिलाव प्रक्रिया) सहभागामध्ये इच्छुक प्रस्तावित बोलीदारांकडून स्वारस्याची अभिव्यक्ती मागविण्यात येत आहे. ईओआय प्रक्रिया दस्तावेजांमध्ये विहित सदर अटी व शर्ती www.tagoffshore.in वर पाहता येऊ शकतील.
अर्जदारांनी त्यांचे ईओआय हे www.tagoffshore.in वरील ईओआय प्रक्रिया दस्तावेजाअंतर्गत विहित स्वरूपात व प्रारूपातूनच सादर करावेत.

| | |
|---|---|
| कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | टॅग ऑफशोअर लिमिटेड |
| कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन दिनांक | २१.०३.२००३ |
| कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर | U63090MH2003PLC139657 |
| कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय | युनिट क्र. बी ००२, तळमजला, एव्हरेस्ट निवारा इन्फोटेक पार्क, प्लॉट क्र. डी ३, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, तुर्भे, एमआयडीसी, नवी मुंबई, ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०५, भारत. |
| वेबसाइट | www.tagoffshore.in |
| परिसमापन प्रारंभ दिनांक | २६.०९.२०१९ |
| स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या (ईओआय) सादरीकरणाची अंतिम तारीख | दि. २९.०१.२०२० (टॅगचे प्रथम ई-लिलाव दि. १०.०१.२०२० मध्ये इरठे सादर करण्यास पात्र असलेले ईओआय अर्जदार आपोआप पात्र ठरतील व नवीन इरठे सादरीकरणातून त्यांना सूट देण्यात येईल.) |
| ईओआय प्रक्रिया दस्तावेज | ईओआय सादरीकरणासाठीचे विस्तृत ईओआय प्रक्रिया दस्तावेज वेबसाइट www.tagoffshore.in वर उपलब्ध आहेत. |
| पात्रता अर्हता | ईओआय सादरीकरणाकरिताची पात्रता अर्हता ईओआय प्रक्रिया दस्तावेजांमध्ये विहित आहे. सदर आमंत्रणांतर्गत ईओआय प्रस्ताव सादर करणारी व्यक्ती ही आयबीसीच्या कलम २९ए च्या अटीनुसार अपात्र व्यक्ती नसावी. यासंदर्भात निश्चितीकरणाचे प्रतिज्ञापत्र इच्छुक बोलीदारांनी सादर करणे आवश्यक आहे. |
| सहभाग शुल्क | नापरतावा सहभाग शुल्क रु. १००००/- परिसमापकांकडे ईओआय सादरीकरणाच्या वेळी जमा करावे. (टॅगचे प्रथम ई-लिलाव दि. १०.०१.२०२० मध्ये इरठे सादर करण्यास पात्र असलेले ईओआय अर्जदार आपोआप पात्र ठरतील व सदर शुल्काच्या प्रदानातून सूट देण्यात येईल.) |
| ईओआय सादरीकरणाचे स्वरूप | कृपया ईओआय प्रक्रिया दस्तावेज पहावेत. |
| भागधारकांची सूची | परिसमापन प्रक्रियेअंतर्गत प्राप्त दाव्यांच्या आधारावर तयार करण्यात आलेली भागधारकांची सूची www.tagoffshore.in वर अपलोड करण्यात आली आहे. |
| वेसल्सचा तपशील व त्यांचे राखीव मूल्य | वेसल्सचा तपशील व त्यांचे राखीव मूल्य हा ईओआय प्रक्रिया दस्तावेजांच्या अटी व शर्तीचा भाग असेल जे www.tagoff-shore.in वर अपलोड करण्यात आलेले आहेत. |
| ई-लिलाव दिनांक व वेळ | शनिवार, दि. ०१.०२.२०२० रोजी दु. २.३० ते दु. ४.३० या वेळेत विक्री पूर्ण होईपर्यंत दरवेळी १० मिनिटांच्या स्वयंविस्तारासह. |
| ईओआय प्रक्रिया सादरीकरणाची (पात्र असल्यास) अंतिम तारीख व वेळ | दि. ०१.०२.२०२० रोजी दु. १२.०० पर्यंत |
| बोली गुणक | रु. ५०००००.०० |
| परिसमापकांचे नाव, पत्ता व ई-मेल पत्ता | सुदीप भट्टाचार्य, आयपी नोंदणीकरण क्र. : IBBI/IPA-003/IP - P 0080/2017-18/10703<br>पत्ता : द्वारा डफ अँन्ड फेल्प्स इंडिया प्रा. लि., १४ वा मजला, रहेजा टॉवर, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.<br>Liquidator.tagoffshore@duffandphelps.com |

टीपा :

- ही बाब स्पष्ट करण्यात येत आहे की सदर जाहिरात ही प्रस्तावित बोलीदारांच्या अभिव्यक्तीच्या निश्चितीकरिता आहे व टॅगच्या संपत्तीच्या विक्रीकरिता परिसमापक वा टॅगच्या वतीने कोणत्याही प्रकारची बांधीलकी निर्माण करीत नाही. कोणत्याही प्रकारची शंका टाळण्यासाठी ही बाब स्पष्ट करण्यात येत आहे की हे कोणतेही प्रस्ताव दस्तावेज नाहीत. सर्व करांचे प्रदान खरेदीदारांना चुकते करावे लागेल.
- पात्रता अर्हतांसमवेत कोणत्याही बोलीदारांना आमंत्रित करण्याकरिताच्या अटी व शर्ती या आयबीसी व टॅगच्या परिसमापकांद्वारे निश्चित करण्यात येतील व कोणत्याही टप्प्यावर त्यांमध्ये बदल/सुधारणा वा परिवर्तन करण्यात येईल.
- कोणतेही कारण न देता व कोणतीही सूचना वा दायित्वाविना प्रक्रिया अटी स्थगित करणे/तहकूब करणे/रद्द करणे/विस्तारित वा सुधारित करणे किंवा कोणत्याही प्रस्तावित बोलीदार/बोली/प्रस्तावास रद्द वा अपात्र करण्याचा अधिकार टॅगच्या परिसमापकांकडे राखून आहे.
- सदर जाहिरात ही आयबीसी व त्याअंतर्गत विनियमांच्या तरतुदींच्या अधीन, परंतु आयबीसीच्या कलम ५२ व ५३ पर्यंत मर्यादित नसलेली आहे. बोलीदार/अर्जदारांना नोंद घ्यावी की लिलाव करावयाची संपत्ती ही आयबीसीनुसार व त्यांच्या अधीन असेल व आयबीसीच्या कलम ५२ नुसार कोणतीही प्रतिभूती हितसंबंध हे प्रतिभूत ऋणकोंद्वारे विमुक्त करण्यात आल्यास, संबंधित प्रतिभूत ऋणकोंद्वारे जसा व जेव्हा सदर पर्याय वापरला जाईल तेव्हा ते परिसमापकांद्वारे आयोजित लिलाव प्रक्रियेतून वगळण्यात येतील. आपली बोली सादर करण्यापूर्वी प्रस्तावित बोलीदारांनी लिलाव करावयाच्या संपत्तीसंदर्भात विवरण, मोजमाप, स्वरूप, प्रकार, वर्गीकरण, भार, दावेखटले, जप्ती, संपादन दायित्वे तसेच दावे/हक्क/देणी आदींसंदर्भात स्वतंत्र चौकशी करावी.
- सदर जाहिरात ही परिसमापक/टॅग यांच्याकडून कोणतीही वचनबद्धता वा सादरीकरण करीत नाही वा तसे समजण्यात येऊ नये.
- सदर जाहिरातीच्या मजकुरातील वेळ मर्यादा/-सुधारणातील विस्तार हा अन्य वर्तमानपत्रांत केला जाणे आवश्यक नाही परंतु तो थेट वेबसाइट www.abgindia.com वर सूचित करण्यात येईल.
- प्रस्तावित बोलीदारांनी स्पष्टिकरण, सुधारणा तसेच लिलाव दिनांकातील विस्तार दिनांक काही असल्यास त्यासंदर्भात स्वतःस अद्ययावत ठेवण्यासाठी वेबसाइट लिंक www.tagoffshore.in येथे नियमित स्वरूपात भेट द्यावी.

सदर जाहिरात ही www.tagoffshore.in वरील ईओआय प्रक्रिया दस्तावेजांमध्ये विहित अटी व शर्तींच्या अधीन आहे.

दिनांक : २५.०१.२०२०
ठिकाण : मुंबई
सही/-
सुदीप भट्टाचार्य
टॅग ऑफशोअर लिमिटेडचे परिसमापक